# पर्यावरण विभाग, पुणे महानगरपालिका
## शिवाजीनगर, पुणे ४११००५

पुणे म.न.पा.च्या पर्यावरण विभाग अंतर्गत पर्यावरण संबंधी नेमून दिलेले दैनंदिन कामकाज करणे करिता करार पद्धतीने व ६ महिने तात्पुरत्या कालावधीसाठी शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | प्रति माह एकवट वेतन | शैक्षणिक पात्रता | अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | पर्यावरण व्यवस्थापक | र.रु. ८०,०००/- | Masters Degree in Environmental Engineering / Technology / Science. PhD असल्यास प्राधान्य देण्यात येईल. | प्रदूषण नियंत्रण / व्यवस्थापन या क्षेत्रातील ५ पेक्षा अधिक वर्षांचा अनुभव | १ |
| २. | सिटी कोऑर्डीनेटर | र.रु. ३०,०००/- | B.E. Civil / MSc, Environment | शासकीय / निमशासकीय अथवा महानगरपालिका किंवा 'अ' वर्ग नगरपालिका येथे माझी वसुंधरा अभियानामध्ये किमान ६ महिने काम केल्याचा अनुभव | २ |

अटी : १. वरील पदांसाठी उप आयुक्त, पर्यावरण, पुणे म.न.पा. यांचे नावे अर्ज करावा व मुलाखतीचे वेळी सोबत आणावा. अर्जामध्ये उमेदवाराने संपूर्ण नाव, पत्ता, जन्मदिनांक, वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, दूरध्वनी क्र., मोबाईल नं. इ. बाबी नमूद करणे आवश्यक आहे. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या दाखल्यांच्या प्रमाणित केलेल्या सत्यप्रती (ट्रू-कॉपी) जोडणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने अर्जावर स्वतःचा एक पासपोर्ट साईज फोटो चिकटवावा.

२. वरील पदावरील नेमणुका दरमहा एकवट वेतनावर, करार पद्धतीने व ६ महिने तात्पुरत्या कालावधीसाठी केल्या जातीलः

३.अपूर्ण अर्ज अगर अर्जासोबत उपरोक्त नमूद दाखल्याच्या प्रमाणित सत्यप्रती (ट्रू-कॉपी) जोडलेल्या नसल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४. रिक्त पदाच्या तुलनेत अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य त्या निकषांप्रमाणे छाननी करून आवश्यक त्या संख्येने उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलाविण्यात येईल.

५. उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा व मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

७. निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे म.न.पा. यांनी राखून ठेवले आहेत.

८. निवड झालेल्या उमेदवारास स्वखर्चाने करार करुन द्यावा लागेल.

९. उपरोक्त पदांसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख जाहिरातीच्या दिनांकापासून १५ दिवस पुढे राहील यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरील अर्ज उप आयुक्त पर्यावरण, पर्यावरण विभाग, पुणे म.न.पा., मुख्य नवी इमारत, शिवाजीनगर पुणे-४११००५ येथे स्वीकारण्यात येतील.

१०. निवड झालेल्या उमेदवारांना १ महिन्याच्या एकवट वेतनाइतकी रक्कम अनामत म.न.पा. कडे ठेवावी लागेल.

११. सदर नियुक्त्या करार पद्धतीने होणार असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना म.न.पा.च्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर नियुक्तीकरिता हक्क सांगता येणार नाही. तसेच म.न.पा. कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

१२. अ.क्र. २ च्या पदासाठी पर्यावरण संबंधी महाराष्ट्र शासनाचे माझी वसुंधरा अभियान व तत्सम अभियानामध्ये काम केलेल्या क्षेत्रातील उमेदवारांना नियुक्तीकरिता प्राधान्य दिले जाईल.

स्वाक्षरी/-
उप आयुक्त, पर्यावरण विभाग
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र.